# कृषि पणन विषयक बातम्या : डिसेंबर 2023

सकाळ TODAY Dt. 27/12/2023 SakalNews @SakalMediaNews www.esakal.com

### योजनेस सरकारची मान्यता ; प्रतिबाजार समितीला ५० ते ७० टक्के अनुदान

## राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतकरी भवन

**बारामती, ता. २६ : राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन बांधण्याच्या एका महत्त्वाकांक्षी योजनेस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने या संदर्भात अध्यादेश जारी केला आहे. यामुळे ज्या बाजार समितीस शेतकरी भवन इमारत नसेल, त्यांना ही इमारत उभारणे सुकर होणार आहे. यासाठी राज्य शासन वर्गवारीनुसार ५० ते ७० टक्के प्रतिबाजार समिती अनुदान प्रदान करणार आहे.**

राज्यात ३०६ बाजार समित्यांपैकी १९० बाजार समिती यांच्या मुख्य आवारामध्ये शेतकरी भवन उपलब्ध आहे, तर ११६ बाजार समितीमध्ये किंवा त्यांच्या उपबाजारात शेतकरी भवन अस्तित्वात नाही. अर्थमंत्री अजित पवार यांनी २०२३ - २४ साठी सादर केलेल्या अर्थसंकल्पात कृषी उत्पन्न बाजार समिती येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारणी साठी घोषणा केली होती, त्यानुसार आता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे. 'अ' व 'ब' वर्ग बाजार समिती यांना अंदाजित खर्चाच्या ५० टक्के तर 'क' व 'ड' वर्ग बाजार समिती यांना ७० टक्के शासन अनुदान मिळेल. उर्वरित निधी संबंधित बाजार समिती यांनी स्वनिधी किंवा कर्ज यातून उभा करावयाचा आहे.

यामध्ये तळमजल्यावर बहुउद्देशीय हॉल अधिक तीन दुकाने, पहिल्या मजल्यावर प्रत्येकी चार बेडच्या चार रूम व दोन बेडच्या दोन रूम याप्रमाणे एकूण वीस बेड क्षमतेच्या सहा खोल्या उभारण्यात येणार आहेत. या शेतकरी भवनांचा अंदाजित खर्च दीड कोटी रुपये इतका असेल. दरम्यान, ज्या बाजार समित्यांमध्ये शेतकरी भवन अस्तित्वात आहे, परंतु ते सुस्थितीत नाही, अशा अस्तित्वातील शेतकरी भावनांच्या दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाच्या पंचवीस टक्के व कमाल १५ लाख रुपयांपर्यंत बाजार समितीला शासनाकडून दुरुस्तीसाठी अनुदान देण्यात येणार आहे.नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी १०४ कोटी रुपये व अस्तित्वातील शेतकरी भवन दुरुस्तीसाठी २८ कोटी ५० लाख रुपये याप्रमाणे एकूण १३२ कोटी ४८ लाख रुपयांची तरतूद राज्य शासनाने केली आहे. सन २०२३- २४ ते २०२५ -२६ या तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीमध्ये ही योजना राबविणे अनिवार्य असेल. या योजनेसाठी लाभार्थी निवड निकषांमध्ये बाजार समितीचे मागील वर्षीचे आर्थिक लेखापरीक्षण झालेले असावे व त्यामध्ये गंभीर दोष नसावेत ही मुख्य अट आहे.

> शेतकरी भवन उभारण्याच्या या योजनेसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाठपुरावा केला होता. त्यामुळे राज्यातील सर्वच बाजार समिती यांना शेतकरी भवन उभारणी आता सुलभ होणार आहे. शेतकऱ्यांच्या निवासाची यामुळे सोय होऊ शकेल.
> **- सुनील पवार,** सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती.

### समितीकडे स्वनिधी असणे गरजेचे

बाजार समितीकडे देखरेख शुल्क व महाराष्ट्र राज्य कृषिप्रधान मंडळाचे कर्ज व अंशदान अशी कोणतीही थकबाकी नसावी, शेतकरी भवन बांधण्यासाठी बाजार समितीकडे बाजार समितीच्या आवारात स्वतःची जागा असली पाहिजे, तसेच शासनाने केलेल्या मॉडिलमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी तसेच शेतकरी भवन दुरुस्तीसाठी येणाऱ्या अंदाजित खर्चासाठी संबंधित बाजार समितीकडे स्वनिधी उपलब्ध असणे गरजेचे असेल.

बुधवार, २७ डिसेंबर २०२३
सकाळ ॲग्रोवन

# सावता माळी बाजार अभियान 'पणन'कडे

## निर्णय जारी; 'पणन' काय करणार याविषयी अस्पष्टता

ॲग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : 'विकेल ते पिकेल' या धोरणांतर्गत संत शिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियान पुन्हा एकदा पणन विभागाकडे देण्यात आले आहे. त्याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. मात्र, या अभियाना अंतर्गत निश्चित करण्यात आलेली अनेक उद्दिष्टे कृषी विभागाशी संबंधित आहेत. त्यामुळे पणन विभाग यात नेमके काय करणार याची स्पष्टता शासन आदेशात नाही.

तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पणन राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्या संकल्पनेतून २०१६ मध्ये संतशिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियान सुरू करण्यात आले होते. या अंतर्गत आठवडी बाजार भरविण्यात येत होते. मात्र, या योजनेत कालांतराने मरगळ आली. कोविड काळात लॉकडाऊन करण्यात आले होते. त्यावेळी घरपोच फळे, भाजीपाला आणि अन्य शेतीमाल देण्याची संधी प्राप्त झाल्यानंतर ही योजना कृषी विभागाकडे शासन आदेशाद्वारे वर्ग करण्यात आली होती. त्यानुसार 'विकेल ते पिकेल' ही व्यापक संकल्पना घेऊन हे अभियान नव्याने विकसित केले होते. शेतीमाल उत्पादक आणि ग्राहकाला काय हवे, याचा शोध घेऊन त्यानुसार पीक पद्धती, कृषी प्रक्रिया, पुरवठा साखळी, विक्री व्यवस्था विकसित करणे आदींबाबत मदत करण्यासाठी या अभियानाचा उपयोग करणे हा मुख्य उद्देश होता. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या संस्थांद्वारे काढणीपश्चात हाताळणी, मूल्यवृद्धी आणि प्राथमिक प्रक्रिया केलेला माल संघटित खरेदीदार, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातदारांना पुरवठा करण्याची व्यवस्था उभी करण्यावर भर देण्यात येणार होता. आता हे अभियान पणन विभाग सुरू ठेवणार असून कृषी विभागाने निश्चित केलेली कार्यपद्धती तशीच राहणार आहे.



### ...असे आहे 'विकेल ते पिकेल' अभियान

- बाजारात मागणी असलेल्या पिकांच्या लागवडीवर भर देणे
- पिकांचे अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण उत्पादन घेणे
- शेतीव्यवसाय हा उद्योगक्षम करणे
- शेतीमाल विक्रीसाठी ब्रँड विकसित करणे
- शेतीमाल मूल्यसाखळी विकास प्रकल्पाद्वारे बाजाराच्या वाढीव संधी उपलब्ध करणे
- कृषी व्यवसाय सुलभतेसाठी धोरणात्मक बदल करणे
- कृषी क्षेत्रात गुंतवणूक वाढविणे
- शेती उत्पादनात शाश्वतता आणणे व निव्वळ उत्पन्नात वाढ करणे
- बाजारपेठीय माहितीचे विश्लेषण करणे व उत्पादकांना त्याची माहिती देणे

पुढारी

# ११६ बाजार समित्यांमध्ये होणार शेतकरी निवास

## ५० ते ७० टक्क्यांइतके अनुदान मंजूर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये रात्री-अपरात्री शेतमाल घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांच्या निवासाची गैरसोय टाळण्यासाठी बाजार समित्यांना मंजूर खर्च मर्यादेच्या ५० ते ७० टक्क्यांइतके अनुदान मंजूर केले आहे. त्यामुळे योजनेनुसार ११६ बाजार समित्यांमध्ये घोषित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यात ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत असून, ६२३ उपबाजार आहेत. या बाजार आवारांमध्ये फळे-भाजीपाला, अन्नधान्यांची मोठ्या प्रमाणात आवक होते. सद्यःस्थितीत ३०६ पैकी १९० बाजार समित्यांमध्ये शेतकरी भवनाची सोय असून, ११६ बाजार समित्या अथवा उपबाजारांमध्ये शेतकरी भवन अस्तित्वात नाही. त्या ठिकाणी शेतकऱ्यांना मुक्कामासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन बांधण्यात येतील.

> बाजार आवारात रात्री-अपरात्री शेतमाल विक्रीस आणल्यानंतर शेतकऱ्यांच्या निवासाची सोय होणार आहे. शिवाय योजनेतून शेतकरी भवन उभारण्यासाठी मंजूर खर्च मर्यादेच्या ५० ते ७० टक्क्यांइतके अनुदान मंजूर आहे. त्यामुळे बाजार समित्यांवर मोठा भुर्दंड बसणार नाही. त्यामुळे पात्र बाजार समित्यांनी योजनेचा फायदा घेऊन जिल्हा उपनिबंधकांमार्फत प्रस्ताव तत्काळ सादर करावेत.
>
> **- डॉ. केदारी जाधव,**
> पणन संचालक, महाराष्ट्र.

जेवणाच्या सोयीसाठी शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकरी भवनची योजना २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन आर्थिक वर्षांच्या कालावधीत राबविली जाईल. योजनेत बांधकामाचे क्षेत्रफळ ५ हजार १६३ चौरस फुटाचे राहणार असून, एकूण २० बेडची सुविधा पहिल्या मजल्यावर राहील. तळमजल्यावर बहुउद्देशीय हॉल व तीन दुकाने राहतील. त्यासाठी ४ हजार ५३६ चौरस फुटांची जमीन आवश्यक आहे.

शासनाने निश्चित केलेल्या मॉडेलनुसार, एका शेतकरी भवनसाठी अंदाजित खर्च हा १ कोटी ५२ लाख ९१ हजार ९७० रुपये अपेक्षित आहे. बाजार समित्यांच्या उत्पन्नाच्या वर्गवारीनुसार अ आणि ब वर्गातील समित्यांना अंदाजित खर्चाच्या ५० टक्क्यांप्रमाणे ७६ लाख ४६ हजार रुपये तसेच क आणि ड वर्ग बाजार समित्यांना अंदाजित खर्चाच्या ७० टक्क्यांप्रमाणे १ कोटी ७ लाख ४ हजार रुपयांइतके शासन अनुदान देण्यात येईल. उर्वरित निधी संबंधित बाजार समित्यांनी स्वनिधी अथवा कर्जातून उभा करावयाचा आहे. अस्तित्वात असलेल्या शेतकरी भवनाची दुरुस्तीही करता येणार आहे.

# वांबोरी उपबाजारात शेतमाल तारण कर्ज योजनेचा शुभारंभ



**राहुरी (तालुका प्रतिनिधी)**– काल गुरुवार १४ डिसेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती राहुरीचे उपबाजार आवार वांबोरी येथे शेतमाल तारण कर्ज योजनेचा सन २०२३-२४ करिता शुभारंभ झाला.

याप्रसंगी माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य अॅड. ऋषिकेश मोरे यांच्या शुभहस्ते लाभार्थी शेतकरी हरिश्चंद्र रमाकांत साळुंके यांना शेतमाल तारण कर्ज योजनेचा धनादेश अदा करण्यात आला. यावेळी जि.प. चे माजी अध्यक्ष बाबासाहेब भिटे, बाजार समितीचे माजी सभापती अॅड. भानुदास नवले, साठाअधीक्षक वखार महामंडळ वांबोरीचे के. आर. देवकाते, श्री शिंदे, सचिव बी. ए. जरे, संचालक महेश पानसरे, नितीनकुमार बाफना, राष्ट्रवादीचे प्रशांत नवले, मधुकर पटारे, यशवंत पवार, पोपटराव पुंड, शिवाजी मोरे (मेजर), रवींद्र ढगे, राजेंद्र गांधले, नितीन नवले, नवनाथ गवते आदींसह ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बांधव उपस्थित होते.

नितीनकुमार बाफना यांनी उपस्थितांना शेतमाल तारण कर्ज योजनेबाबत माहिती देताना सांगितले, शेतकरी बांधवांनी उत्पादित केलेला शेतमाल काढणी हंगामात त्याच्या आर्थिक निकडीमुळे त्वरित विक्रीसाठी बाजारात आणतात. त्यामुळे विक्रीसाठी एकाचवेळी बाजारपेठेत शेतमालाची मोठ्या प्रमाणावर आवक होते व त्यामुळे बाजारभाव कमी होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. शेतकरी बांधवांनी शेतमालाची काही काळासाठी साठवणूक करून बाजारभाव चांगले असताना साठवणुकीतील शेतमाल टप्प्याटप्प्याने विक्रीसाठी आणला तर शेतकऱ्यांना त्याचा चांगला फायदा होईल. त्यामुळे शेतकरी बांधवांची आर्थिक निकड पूर्ण होऊन त्याच्या शेतीमालाला रास्त भाव मिळावा यादृष्टीने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ ही योजना राबवीत आहे. या योजने मध्ये शेतकरी बांधवांनी ७/१२ उतारा आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स, वखार पावती इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता आहे. वखार महामंडळामध्ये आपला शेतीमाल ठेवून त्याची वखार पावती घ्यावी, सदरील पावतीवर शेतमालाच्या चालू बाजारभाव किंवा हमी बाजारभाव यांच्या बाजारभावानुसारच्या रकमेच्या ७५ टक्के रक्कम १८० दिवसांच्या मुदतीसाठी ६ टक्के व्याजदराने तारण कर्ज बाजार समितीकडून त्वरित देण्यात येते. शेतमाल तारण कर्ज योजनेत तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, चना, करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, भात (धान) वाघ्या, घेवडा (राजमा) हळद काजू बी, बेदाणा व सुपारी इ.पिकांचा समावेश केला आहे. अशा प्रकारची माहिती त्यांनी दिली.

निखील हरिश्चंद्र साळुंके, आशा पुंड, मंगल हरिश्चंद्र साळुंके या लाभार्थी शेतकऱ्यांनाही धनादेश देण्यात आले. अशा प्रकारे जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीचे सचिव बी. ए. जरे यांनी केले. आभार शेतमाल तारण कर्ज योजना प्राधिकृत अधिकारी एस. ए. पावले यांनी मानले.

# विक्री व्यवस्थेतील बदलच तारेल शेतीला



डॉ. भास्कर गायकवाड
९८२२५१९२६०

**शेतीतून आर्थिक प्राप्ती झाली तरच पुढील पिढी शेती व्यवसाय चांगल्या मानसिकतेतून करेल. दोन पिढ्यांमधील हा प्रवास अत्यंत संवेदनशील वळणावर येऊन थांबलेला आहे. यासाठी गरज आहे परिवर्तनाची आणि हे परिवर्तन होऊ शकते विक्री व्यवस्थेतील मोठ्या बदलांमुळेच!**

कृषिक्षेत्रात आज मोठ्या प्रमाणात बदल दिसून येत आहे. ग्राहकाभिमुख उत्पादनावर भर देणे ही काळाची गरज आहे. हरितक्रांती झाली त्या वेळी पिकविलेले विकण्याची काळजी नव्हती. आज पिकविलेले विकण्यासाठी मोठी धडपड करावी लागते. त्या काळात अन्नधान्य स्वावलंबन हा प्रश्न होता. आज अन्नधान्य स्वावलंबन झाले परंतु शेतकरी परावलंबी होऊ लागलेला आहे. शेतीमधील उत्पादन खर्चात मोठी वाढ होत आहे. खते, कीडनाशके, मशागती, मजूर, वीज, पाणी, वाहतूक या सर्व बाबींच्या किमती भरमसाट वाढून, गगनाला टेकलेल्या असताना शेतीमालाचे दर मात्र जमिनीवरच रेंगाळत आहेत. शेती ही अनेकदृष्ट्या किफायतशीर राहिलेली नाही. जमीनधारणा कमी होत आहे. हवामान चक्रात बदल होऊन थंडी, उन्हाळा, पावसाळा यांच्यातील वैविध्यता आणि अनिश्चितता वाढत चालली आहे. त्याचा मोठ्या प्रमाणात परिणाम शेतीवर होत आहे. पिकाचे नुकसान झाले तर जेवढे नुकसान झाले त्या प्रमाणात भरपाई देण्यासाठी विमा कंपन्या पुढे येण्यास तयार नाहीत. तयार झाल्या तर त्यासाठी द्यावी लागणारी रक्कम शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेरची आहे.

या सर्वांवर मात करून जास्त उत्पादन काढले तर उत्पादन वाढले म्हणून भाव कोसळतात. त्यामुळे शेती तोट्यात जाते. शेतकरी कर्जबाजारी होतो. उत्पादन घटले तर मध्यस्थ-विक्रीव्यवस्था नफेखोरी करतात. शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत नाही. ग्राहकांना शेतीमाल जास्त दराने द्यावा लागला म्हणजे त्यांची नाराजी वाढते. शासन तत्काळ कार्यवाही करून आयात वाढविते किंवा निर्यातीवर बंधन आणते. शेतीमालाचे दर पडतात. परत शेतकरी त्या पिकापासून दूर जातो. एखाद्या पिकाचे उत्पादन वाढले आणि भाव पडले तर शेतकऱ्यांना सल्ला दिला जातो की तुम्हाला दुसरे पीक करता आले नाही काय? एकाच पिकाच्या मागे का लागतात. शेतकऱ्यांनी कोणते पीक करावे म्हणजे त्याला हमखास भाव मिळेल, त्याची शेती तोट्यात जाणार नाही, अशी खात्री देणारी यंत्रणा सध्या तरी अस्तित्वात नसताना त्यांना सांगितले जाते, की मार्केटचा आणि ग्राहकांच्या मागणीचा अभ्यास करून पिकाचे नियोजन केले पाहिजे. ग्राहकांची खाण्याची सवय बदलत आहे. त्यानुसार त्याची मागणी बदलत आहे. याचा विचार उत्पादक म्हणून शेतकऱ्यांना करावा लागतो. निसर्गाच्या लहरीपणाला तोंड द्यावे लागते. कृषी निविष्ठांची वाढलेली किंमत गुपचूप मोजावी लागते. मजूर मागेल तेवढे मोल द्यावे लागते. समाजात कमी दर्जाचे काम म्हणजे शेती अशी सामाजिक मानसिकता ठेवून शेतीमध्ये शारीरिक कष्ट करावे लागते. काही करता आले नाही म्हणून शेती करतो अशी हेटाळणी ऐकावी लागते.

या मानसिकतेमुळेही युवा पिढी या व्यवसायापासून दूर जाण्याचाच प्रयत्न करते. तंत्रज्ञान आत्मसात करून पिकाचे उत्पादन काढून बाजारपेठेपर्यंत पोहोचवावे लागते. एवढे करून त्याच्या मालाची नासाडी होते. अनेकदा तर मानसिक त्रास आणि अपमान सहन करून अडते-व्यापारी ठरवतील त्या किमतीत शेतीमाल द्यावा लागतो. मग ती किंमत त्याच्या उत्पादन खर्चाचा काहीही विचार न करता ठरविलेली कवडीमोल असेल तरी ती स्वीकारावी लागते. शेतकऱ्यांकडून विकत घेतलेल्या शेतीमालाचे दर त्याच्यासमोर दोन पट-तीन पट होतात. त्यावेळी त्याला काय वाटत असेल याचा विचार होत नाही. सहा महिने-वर्षभर कष्ट करून जेवढे मिळत नाही त्यापेक्षा जास्त एक-दोन तासांत मध्यस्थ घेतात. शेतकरी आत्महत्या करतो. अनेक प्रसार माध्यमातून त्यावर चर्चा होते. आजची तरुण पिढी हे पाहते. शिक्षण करूनही नोकरी मिळत नाही म्हणून शेती करावी लागते. तरुण मुलगा शेती करतो म्हणून समाजात चर्चा होते. लग्नाच्या बोहल्यावर उभे राहिल्यावर कमी भाव आणि मुलींचा तुटवडा हे ठरलेले. अशा नकारात्मक मानसिकतेमध्येही युवा पिढी नवनवीन प्रयोग करून अशाश्वत व्यवसायातून शाश्वत उत्पादन काढून उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न करते आणि इतरांच्या तोंडापर्यंत अन्न घेऊन जाते. याची जाणीव समाजाला ठेवावी लागेल. निसर्गात होणारे बदल, जमीन-पाणी यांसारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा तुटवडा, वाढलेला उत्पादन खर्च या सर्व बाबींचा विचार केला तर शेती किफायतशीर होणे अवघड वाटते. त्यामुळे विक्री व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल होण्याची गरज आहे.

उत्पादन तंत्रज्ञानाबरोबरच विक्री व्यवस्थेमधील तंत्रज्ञानाचा अवलंब वाढणे गरजेचे आहे. शेतीतून आर्थिक प्राप्ती झाली आणि त्याला योग्य मानसन्मान मिळाला तरच पुढील पिढी शेती व्यवसाय चांगल्या मानसिकतेतून करेल. दोन पिढ्यांमधील हा प्रवास संवेदनशील वळणावर येऊन वेग कमी झालेला, किंबहुना काही ठिकाणी थांबलेला आहे. यासाठी गरज आहे परिवर्तनाची आणि हे परिवर्तन होऊ शकते विक्री व्यवस्थेतील मोठ्या बदलांमुळे! दुसऱ्या हरितक्रांतीचे बीज या व्यवस्थेतील बदलामध्येच दडलेले आहे. त्याला योग्य खत-पाणी देऊन, चांगला सांभाळ करून जपले तर निश्चितच शेतकरी यातून पुढे जाईल. देशाच्या एकूण विकासाचा दर १० अंकी, किंबहुना त्यामध्ये वाढ करण्याची क्षमता कृषिप्रधान देशातील शेतकऱ्यांमध्ये आहे आणि त्यासाठी कमीत कमी चार ते पाच टक्के कृषी विकासाचा दर गाठणे हेच उद्दिष्ट घेऊन यापुढील उपाययोजना कराव्या लागतील. रिटेल क्षेत्राची गुंतवणूक वाढल्यानंतर पणन व्यवस्थेमध्ये मोठे बदल होणे अपेक्षित आहेत.

आज आपण शेतात जे पिकवितो ते विकण्यासाठी प्रयत्न करतो. विकत नसेल तर जे मिळते ते पदरात पाडून घेऊन समाधान मानतो. परंतु रिटेल क्षेत्रात सहभागी होत असताना पिकविलेले विकण्याऐवजी विकणारे पिकवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. कारण रिटेल क्षेत्रात उतरणाऱ्या कंपनीच्या दृष्टीने ग्राहक हा त्यांचा केंद्रबिंदू असणार आहे. त्यांच्या खिशातून पैसे काढत असताना त्यांना जी वस्तू ज्या स्वरूपात आणि ज्या वेळी पाहिजे त्या पद्धतीने उपलब्ध करून देण्यावर कंपन्या त्यांचे लक्ष केंद्रित करतील. शेतकरी हा या कंपन्यांचा पुरवठादार असेल. त्यामुळे पुरवठादारांकडून त्या प्रकारची वस्तू तयार करून पुरवठा करण्यासाठी सूचना देतील. जे शेतकरी तसा शेतीमाल तयार करून देतील त्यांना या कंपन्या चांगली रक्कम मोजायला तयार होतील. कारण ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादन मिळत असेल, तर कंपनीला निश्चितच त्यांचा व्यवसाय वाढविता येईल. म्हणूनच शेतकऱ्यांना मानसिकता बदलावी लागेल. बाजारपेठेच्या मागणीनुसार शेतीमाल तयार करावा लागेल. शेतीमाल मोढा लावणे, कमी प्रतीचा माल मिसळणे, शेतीमाल हाताळताना योग्य काळजी न घेणे, शेतीमाल स्वच्छ न करणे, निवड न करता मार्केटमध्ये पाठविणे यासारख्या सवयींना यापुढे मूठमाती द्यावी लागेल. आपला शेतीमाल हा जगातील कोणताही भाग असो मग तो प्रगत देश किंवा अप्रगत, तेथे कोणत्याही परीक्षेत पास झाला पाहिजे. याप्रमाणे उत्पादन घेण्याची मानसिकता ठेवावी लागेल. त्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे लागेल.

**(लेखक शेती प्रश्नांचे अभ्यासक आहेत.)**

Agrowon Dt. 15/12/2023

Pudhari Dt. 14/12/2023

# राज्यात उभ्या राहणार 'फळपीक इस्टेट'

## पंजाबच्या धर्तीवर राज्यात अन्य फळांसाठीही प्रयत्न; समिती स्थापन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात फळपिकांसाठी 'फळपीक इस्टेट' स्थापन केल्या जाणार आहेत. पंजाबच्या धर्तीवर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या इस्टेटचे स्वरूप आणि निकष निश्चित करण्यासाठी राज्य शासनाने कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

पंजाब राज्यात दहा हजार हेक्टर संत्रा लागवडीसाठी एक सिट्रेस इस्टेट स्थापन केली जाते. त्याच धर्तीवर राज्यात पाच ठिकाणी लिंबूवर्गीय फळांसाठी अशा प्रकारची सिट्रेस इस्टेट स्थापन केली आहे.

### सिट्रेस इस्टेट काय आहे?

पंजाब राज्यात संत्रा फळासाठी स्थापन केलेली सिट्रेस इस्टेट म्हणजे एक निमशासकीय संस्था आहे. त्याला सरकारकडून आर्थिक तरतूदही केली जाते. त्या ठिकाणी उपसंचालक दर्जाचा अधिकारी आणि तज्ज्ञांची नियुक्ती असते. माती परीक्षण, पानांच्या विश्लेषणापासून उच्च दर्जाची कलमे उपलब्ध करून देण्यापासून ते लागवडीपर्यंतच्या अचडणींचे मार्गदर्शन केले जाते.

भविष्यात राज्यात अन्य ठिकाणी फळपीक इस्टेट स्थापन करण्याची मागणी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर निकष निश्चित करणे आवश्यक आहे. हे निकष ठरविण्यासाठी राज्य शासनाने समिती स्थापन केली आहे.

कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील या समितीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील उद्यानविद्या विभागाचे प्रमुख सदस्य म्हणून काम करणार आहेत. राज्याच्या फलोत्पादन विभागाचे संचालक सदस्य सचिव म्हणून काम करणार आहेत.

राज्यात सिट्रेस इस्टेट स्थापन करण्याची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यानुसार संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यात दोन ठिकाणी, तर मोसंबीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ६२ एकरांवर सिट्रेस इस्टेट स्थापन केल्या आहेत.

### राज्यातील शेतकऱ्यांना होणार फायदा

राज्यात भौगोलिक परिस्थितीनुसार विविध फळांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. कोकणात आंबा, काजूचे मोठे उत्पादन होते. सोलापूर परिसरात डाळिंब, पेरूचे उत्पादन होते. जळगाव परिसरात केळीचे उत्पादन आहे. सांगली, नाशिक परिसरात द्राक्षांचे उत्पादन अधिक होते. आता सर्वच फळांसाठी अशा इस्टेट स्थापन झाल्यास त्या-त्या परिसरातील संबंधित फळ उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे.



# तीन हजार रुपये दराने कांदा खरेदी

## निर्यातबंदीनंतर केंद्र सरकारच्या उपाययोजना

**नाशिक, ता. १२ :** कांदा निर्यातबंदीनंतर शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष कमी करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ अर्थात 'एनसीसीएफ'ने तातडीने तीन हजार रुपये क्विंटल दराने कांदा खरेदीला सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील १२ केंद्रांवर लाल कांद्याची खरेदी होत आहे.

केंद्र सरकारच्या अधिकृत एजन्सी म्हणून 'नाफेड' व 'एनसीसीएफ' यांच्यामार्फत कांदा खरेदी केला जातो. शेतकऱ्यांकडून बाजारभावाप्रमाणे खरेदी केलेला कांदा या संस्था देशात मागणी असलेल्या शहरांमध्ये पाठवतात. पण या संस्था आता थेट व्यापाऱ्यांकडूनच कांदा खरेदी करतात. केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदीचा निर्णय घेतल्याने लाल कांद्याचे दर क्विंटलला हजार ते पंधराशे रुपयांनी कोसळले आहेत. शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी 'एनसीसीएफ'ने मंगळवारी (ता.१२) कांदा खरेदीची जाहिरात प्रसिद्ध करून थेट शेतकरी व सहकारी संस्थांकडून तीन हजार रुपये क्विंटलप्रमाणे खरेदी सुरू केली आहे. प्रती हेक्टरी २८० क्विंटलपेक्षा अधिक कांद्याची खरेदी केली जाणार नसल्याचे 'एनसीसीएफ'ने म्हटले आहे. जिल्ह्यातून साधारणतः दोन लाख टन कांदा खरेदी केला जाणार असल्याचे समजते. यात लाल व उन्हाळ कांद्याचा समावेश आहे.

**प्रतिसादावर भवितव्य अवलंबून**

'नाफेड' व 'एनसीसीएफ'च्या माध्यमातून केंद्र सरकारने गेल्या वर्षभरात पाच लाख टन कांद्याची खरेदी केली आहे. यापुढे दोन लाख टन कांदा खरेदी केला जाणार आहे. त्याला प्रतिसाद कसा मिळतो यावर कांदा दराचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

**या ठिकाणी खरेदी केंद्र**

निफाड, चांदवड, नामपूर, मालेगाव, उमराणे, पिंपळगाव, मुंगसे, लासलगाव, विंचूर, ताहाराबाद, दाभाडी, देवळा.

### लाल कांद्याची प्रथमच खरेदी

'एनसीसीएफ'मार्फत यंदा प्रथमच लाल कांद्याची खरेदी होत असल्याचे शेतकरी सांगतात. कांद्याचा दर्जा, प्रत, गुणवत्ता बघूनच खरेदी करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे गोण्यामध्ये तसेच ट्रॅक्टरमध्ये भरलेल्या कांद्याचीही थेट खरेदी होत असल्याचे 'एनसीसीएफ'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



### 'लाल कांदा खरेदी केंद्र अहमदनगरला सुरू होणार'

"नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथे कांद्याला मिळत असलेला दर नगर जिल्ह्यातही देण्याचे प्रयत्न केले जातील तसेच अहमदनगर (शिर्डी) येथे लाल कांदा खरेदी केंद्र त्वरित सुरू करण्याचा आदेश केंद्रीय कृषी सचिव रोहित कुमार सिंह यांनी संबंधितांना दिला असल्याची माहिती शिर्डीचे खासदार सदाशिवराव लोखंडे यांनी मंगळवारी दिली. कांदा उत्पादकांच्या मागण्यांसाठी लोखंडे यांनी ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री पीयूष गोयल यांची भेट घेतली. कांदा खरेदी दरासंदर्भात तीन मुद्दे गोयल यांच्यापुढे मांडण्यात आले. नाशिक, छ.संभाजीनगर व पुणे जिल्ह्यात सध्या कांद्याचा प्रती किलोचा दर २४.०३ रुपये आहे. मात्र अहमदनगर (शिर्डी) येथे हाच दर २०.७५ रुपये इतका आहे. किलोमागे तीन रुपयांचे नुकसान भरून काढण्यासाठी केंद्र सरकारने आदेश द्यावेत व नगर जिल्ह्यातही २४.०३ रुपये प्रति किलो प्रमाणे सरकारने कांदा खरेदी करावा, अशा मागण्या केल्या. त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वासन असल्यावे लोखंडे म्हणाले.

Sakal Dt. 13/12/2023

Dt.07/12/2023

# राज्याला नऊ भौगोलिक मानांकने

## तुळजापूरची कवडी, जालन्याची ज्वारी, कास्तीच्या कोथिंबीरीचा समावेश

**लोकसत्ता वार्ताहर**

**लातूर :** राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण बाबींसाठी देण्यात येणाऱ्या भौगोलिक मानांकनामध्ये या वेळी बदलापूर, बाहडोळीची जांभळे, पेणच्या गणेशमूर्ती, लातूर जिल्ह्यातील कास्ती या गावाची कोथिंबीर, निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथील चिंच आणि बोरसुरी येथील तुरीचा समावेश करण्यात आला आहे. जालनाची दगडी ज्वारी, धाराशीव जिल्ह्यातील कुंथलगिरीचा खवा आणि तुळजापूरच्या कवडीला यामध्ये स्थान देण्यात आले आहे. राज्यातून पाठवलेल्या १८ प्रस्तावांना भौगोलिक मानांकन मिळावे, असे प्रयत्न सुरू होते.


**कास्तीची कोथिंबीर :** लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील कास्ती भागातील कोथिंबिरीला एक प्रकारचा वेगळा सुगंध आहे. बासमती तांदूळ जसा असतो तसेच या कोथिंबिरीला वेगळा वास आहे. मुंबई, नागपूर या मोठ्या शहरांसह अन्य देशातही कोथिंबीर निर्यातही करण्यात येते.



**बोरसुरी डाळ :** निलंगा तालुक्यात बोरसुरी हे गाव आहे. येथील वरण प्रसिद्ध आहे. या भागात बोरसुरी वरणाची मेजवानी करण्यात येते. त्याला डाळ असे संबोधले जात असले तरी या गावातील वरणात टाकल्या जाणाऱ्या मसाल्यामुळे याला नामांकन मिळाले असल्याचे सांगण्यात येत आहे.



**पानचिंचोली चिंच :** पानचिंचोली या गावातील चिंचेचा आकार सहा ते आठ इंचांपर्यंत असतो. गेल्या ३०० वर्षांपासून या गावातील चिंच प्रसिद्ध आहे. या वेळी त्याची वैशिष्ट्ये मांडण्यात आली. लातूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी बी. पी. पृथ्वीराज यांनी या कामासाठी विशेष लक्ष घातले होते. येथील पातडी चिंच उत्पादक संघाच्या वतीने व बोरसुरी येथील तूर डाळ उत्पादक संघाने बोरसुरी तूर डाळ विशेष भौगोलिक मानांकन मिळावे, अशी मागणी केली होती. त्यामुळे या तीन वाणाला आता देशभर वेगळी ओळख निर्माण झाली आहे.



**कुंथलगिरीचा खवा :** धाराशीव जिल्ह्यातील भूम तालुक्यात दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. कुंथल या शब्दाचा अर्थ कुरळा असा होतो. हा भाग डोंगराळ आणि कुरळ्या केसाच्या आकाराचा असल्याने येथे जनावरांची संख्या अधिक आहे.



**तुळजापूरची कवडी :** तुळजापूरला येणारे भाविक कवड्यांची माळ घालतात. कवडी स्त्री देवतांचे उपासक आवर्जून वापरतात. शिवाजी महाराज हे गळ्यात कवड्यांची माळ घालत.



**जालन्याची ज्वारी :** ही ज्वारी टणक असून, पक्ष्यांना सहजपणे फोडता येत नाही. या भागातील ज्वारी वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रामीण अर्थकारणाला चालना देण्यासाठी पुणे येथील गणेश हिंगमिरे जीआय नामांकन क्षेत्रात काम करतात.



पुढारी

# जीआय मानांकनातून ग्रामीण संस्कृतीला प्रोत्साहन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शहरीकरणाचा वेग वाढत असताना ग्रामीण संस्कृतीकडे दुर्लक्ष होत आहे. शेतीत आर्थिक नुकसान होत असल्याने शेतक-यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, यासाठी शास्त्रज्ञ गणेश हिंगमिरे यांनी राज्यातील चिंच, जांभूळासह पेणच्या गणपतीला पेटंट मिळवून दिले आहे.

Geographical Indication of India Logo

राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळावी, यासाठी गणेश हिंगमिरे अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहेत. देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ पेटंट अर्थात जिओग्राफिकल आयडेंटिफिकेशन (जीआय) मिळवून देण्याचे उद्दिष्ट बाळगण्यात आले होते. महाराष्ट्रातील २९ पदार्थांना आधीच पेटंट मिळाले. त्यानंतर महाराष्ट्रातील ९ आणि बोडोलँडमधील १७ पदार्थांच्या जीआयसाठी अर्ज करण्यात आले.

'दैनिक पुढारी'शी बोलताना हिंगमिरे म्हणाले, 'जीआय अर्थात एखाद्या प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ किंवा वस्तूंना मिळणारे पेटंट जीआय मिळवण्यासाठी संबंधित पदार्थांचा इतिहास, भूगोल आणि विज्ञान माहीत असणे आवश्यक असते. ॲग्रिकल्चर आणि नॉन-ॲग्रिकल्चर अशा दोन प्रकारच्या पदार्थांना, वस्तूंना जीआय मानांकन दिले जाते.

चीन आणि युरोपच्या तुलनेत भारतात कमी जीआय मिळाले आहेत. जीआय करण्यासाठी अर्ज करणे, छाननी करणे, अधिकृतता तपासणे, सादरीकरण करणे आणि निकाल देणे अशी प्रक्रिया पार पाडली जाते. त्यानंतर जर्नल प्रकाशित केले जाते.'

> “ भारतात इंडोनेशियामधून चिंच जास्त पैसे मोजून आयात केली जाते. आता लातूरमधील पानचिंचोळीमधील चिंचेला जीआय मानांकन मिळाल्याने राज्यातच कमी दरामध्ये चिंच उपलब्ध होऊ शकेल, स्थानिकांना रोजगार मिळू शकेल. जीआय मानांकनामुळे पदार्थांचे पुनर्जीवन होऊ शकणार आहे.
>
> \- **गणेश हिंगमिरे**, शास्त्रज्ञ.

## जीआय मिळालेले पदार्थ/वस्तू

- पेण गणपती
- पानचिंचोळीची चिंच, लातूर जिल्हा
- बोर्सरी डाळ, लातूर जिल्हा
- कास्ती पुदिना (कोरिंदर), लातूर जिल्हा
- बदलापूर, जांभूळ, ठाणे जिल्हा
- बहाडोली, जांभूळ, पालघर जिल्हा
- जालना दगडी ज्वार, जालना जिल्हा
- कुंतलगिरी खवा
- कवडी माळ

My Pune Edition
Dec 5, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# महाराष्ट्रातील नऊ उत्पादनांना 'जीआय'

## पान चिंचोळीची चिंच, बहाडोली जांभळाचा समावेश

**पुणे (प्रतिनिधी) : कृषीसह विविध उत्पादना संबंधित भौगोलिक निर्देशांक (जीआय) घेण्यामध्ये महाराष्ट्र राज्याने देशात पाचव्या क्रमांकाचे स्थान पटकाविले आहे. आत्तापर्यंत मिळालेल्या एकूण २९ भौगोलिक निर्देशांकामध्ये (कृषी व बिगरकृषीसह) नुकतीच नव्याने नऊ 'जीआय' ची भर पडली आहे. यात मराठवाड्यातील कृषी उत्पादनांची संख्या अधिक असून प्रमुख मिळालेल्या जीआयमध्ये पानचिंचोळी (लातूर) येथील चिंच, बहाडोली जांभूळ (पालघर), जालन्याची दगडी ज्वारी, कास्ती कोथिंबीर (लातूर) आदींचा समावेश आहे.**

पान ४ वर »

### नऊ जीआय उत्पादने पुढीलप्रमाणे...

**कृषी संबंधित जीआय (कंसात ज्यांच्या नावे अर्ज प्रस्ताव)**

- पानचिंचोळी चिंच, पानचिंचोली, ता. निलंगा, जि. लातूर (पानचिंचोली पातडी चिंच उत्पादक संघ)
- बोरसुरी तूर डाळ- बोरसुरी, ता. निलंगा. जि. लातूर (बोरसुरी तूरडाळ उत्पादक संघ)
- कास्ती कोथिंबीर- आशिव, ता. औसा, जि, लातूर (कास्ती कोथिंबीर शेतकरी उत्पादक संघ)
- बदलापूर जांभूळ (जि. ठाणे) (जांभूळ परिसंवर्धन आणि समुदाय विकास चॅरिटेबल ट्रस्ट, बदलापूर)
- बहाडोली जांभूळ (जि. पालघर) (बहाडोली जांभूळ उत्पादक शेतकरी गट, बहाडोली)
- दगडी ज्वारी, जालना (जय किसान शेतकरी गट, मात्रेवाडी, ता. बदनापूर, जि. जोलना)
- कुंथलगिरी खवा, पेढा, धाराशिव (मराठवाडा जीआय संवर्धन संघ, उदगीर, लातूर)

**बिगरकृषी जीआय**

- पेण गणपती
- कवडी माळ

Agrowon Dt. 05/12/2023

# महाराष्ट्रातील नऊ उत्पादनांना जीआय

» पान १ वरून

केंद्र सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून महाराष्ट्रातील या नऊ उत्पादनांना जीआयची स्वीकृती देऊन सरकारी गॅझेटमध्ये तशी नोंदही करण्यात आली आहे. त्यामुळे राज्याने प्राप्त केलेल्या जीआय उत्पादनांची संख्या आता ३८ झाली आहे. त्यात चार बिगरकृषी आणि ३४ कृषीशी संबंधित उत्पादनांचा समावेश आहे. जीआय प्राप्त करण्यामध्ये महाराष्ट्राने भारतात पाचव्या क्रमांकाचे स्थान पटकाविले आहे.

**छोट्या गावांचा समावेश हे उल्लेखनीय**

जीआय मिळवून देण्यामध्ये पुढाकार लाभलेल्या पुणे येथील 'जीएमजीसी' संस्थेचे प्रमुख गणेश हिंगमिरे म्हणाले की नव्याने प्राप्त झालेल्या नऊ 'जीआय' मधील वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील छोट्या गावांचा या माध्यमातून एक प्रकारे सन्मान झाला आहे. आवर्जून सांगायचे तर यापूर्वी दार्जिलिंग चहा यासारखी मोठी उदाहरणे आपल्यासमोर आहेत. मात्र, मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील पानचिंचोळी किंवा तत्सम काही गावांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण जीआय उत्पादनांवर आपले नाव कोरले आहे. असा प्रकारे देशातील कोणतेही छोटे गाव जीआयच्या माध्यमातून पुढे येऊ शकते. त्यातून देश समृध्द होऊ शकतो. आत्तापर्यंत महाराष्ट्रात आम्ही ५१ उत्पादनांसाठी जीआय चे प्रस्ताव पाठवले होते. पैकी ३८ उत्पादनांना जीआय मिळवण्यात यश आले आहे. उर्वरित १३ उत्पादने जीआय मिळवण्याच्या प्रक्रिया अवस्थेत आहेत असेही हिंगमिरे यांनी सांगितले.

Agrowon Dt. 05/12/2023